# सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन

# प्रथम सत्र संकलित मूल्यमापन

**इयत्ता – तिसरी** **विषय – मराठी**

**विद्यार्थ्याचे नाव :** ------------------------------------

**शाळेचे नाव :** ------------------------------ **हजेरी क्र:** ---------- **तुकडी :** ------

**केंद्र :** ------------ **ता :** -------------- **जि :** --------------- **दिनांक :** / /

| प्रश्न क्रमांक | लेखी | | | | | | तोंडी | | एकूण गुण | शिक्षक स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | | |
| प्राप्त गुण | | | | | | | | | | |
| कमाल गुण | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ४० | |

---

प्र.१) शब्द ऐकून लिही. (५गुण)

१) ------------------------ २) ------------------------

३) ------------------------ ४) ------------------------

५) ------------------------ ६) ------------------------

७) ------------------------ ८) ------------------------

९) ------------------------ १०) ------------------------

प्र.२) सूचनेप्रमाणे प्रश्न सोडव. (५गुण)

अ) खालील वाक्यप्रचाराचा वाक्यात उपयोग कर.

फस्त करणे ------------------------------------------------

------------------------------------------------------------

ब) खालील शब्दाचे समुहदर्शक शब्द लिही , जसे पक्ष्यांचा – थवा (कोणताही एक)

१)फुलांचा : ------------------------------------------

२)गुरांचा : ------------------------------------------

क) कवितेच्या ओळी पूर्ण कर.

हा राष्ट्रध्वज साक्षीला ,

----------------------------

ड) मुग्धाने डायरी लिहिण्याचा संकल्प केला ,तसा तुम्ही कोणता संकल्प करणार ?

उत्तर : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

इ) सर्वच उंदीर पिंपापाशी का धावत आले ? योग्य पर्यायाला गोल कर.

१) भीतीने  २) आनंदाने  ३) भज्याच्या वासाने  ४) तेल पिण्यासाठी

प्र.३) खालील चित्राचे निरीक्षण कर व प्रश्नांची उत्तरे लिही.



अ) मुलाच्या हातात काय आहे ? (१गुण)

१) बादली  २) झारी  ३) रोप  ४) फुले

ब) तुमच्या परिसरातील झाडांची माहिती लिही ? (२गुण)

उत्तर : ------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

क) झाडे आपल्याला काय काय देतात ? (२गुण)

उत्तर: ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

प्र.४.अ) चित्र बघ व चित्रात काय संवाद करत असतील ते लिही. (३गुण)



------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

------------------------------------------

ब) खालील वस्तुमधून ओला कचरा व सुका कचरा यांचे वर्गीकरण कर. (२गुण)

केळ्याच्या साली,कागद,खरकटे,पेन,पालेभाज्याचे देठ,तुटकी खेळणी,सडलेली फळे

ओला कचरा : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

सुका कचरा : ----------------------------------------------------------------

----------------------------------------------------------------

प्र.५) खालील अपूर्ण गोष्ट पूर्ण कर. (५गुण)



रविवारची सुट्टी होती.दुपारनंतर आठ ते दहा मुले लगोरी खेळायला बागेत जमली.प्रिया व सचिनच्या गटांनी गडी वाटून घेतले.खेळ सुरु झाला.गौरीने चेंडू मारला .मुलांना चेंडू आडवता आला नाही.चेंडू सरळ दाट झाडीत गेला.मुले चेंडू शोधायला लागली.तेवढ्यात सचिनला झाडीतून सळसळ आवाज आला.पाहतो तर काय साप.....

प्र.६) परिच्छेद वाचन कर व खालील प्रश्न सोडव.

कोल्हापूर ता.१५ आठवडाभर झालेल्या मुसळधार पावसाने पश्चिम महाराष्ट्र जलमय झाला.पावसामुळे कोल्हापूर,सांगली,सातारा व पुणे या शहरातील नद्यांना पूर आला.पावसाचा जोर इतका वाढला होता त्यामुळे पुराच्या पाण्यामुळे बसस्थानक ,रेल्वे स्थानकावर पाणी आले.घरे पाण्याखाली गेली.शेतातील माल,दुकाने,जनावरे पाण्याच्या पुरात बुडाली.शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले.पुरामध्ये माणसे वाहून गेली.अजून आठवडाभर पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे.

अ) मुसळधार पावसाने कोणता भाग जलमय झाला? योग्य पर्यायाला गोल कर. (१गुण)

१) कोकण २) मराठवाडा ३) गोवा ४) पश्चिम महाराष्ट्र

ब) महाराष्ट्रातील कोणत्या जिल्ह्यांना पुराचा तडाखा बसला? (१गुण)

उत्तर:

क) खालील शब्दाचा समानार्थी शब्द लिही ? (उदा.जसे, आई–माता ) (१गुण)

पर्जन्य :

ड) पुरामुळे कोणते नुकसान झाले? (२गुण)

उत्तर:

# अध्ययन निष्पतीवर आधारित तोंडी प्रश्न

तोंडी : १० गुण ✻तोंडी प्रश्नाबाबत शिक्षकांसाठी सूचना✻ प्राप्त गुण :

प्रश्न ७) परिच्छेदावरील आधारित तोंडी प्रश्न सोडव.

भारतरत्न हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान आहे.हा सन्मान राष्ट्रीय सेवेसाठी दिला जातो.या राष्ट्रीय सेवांमध्ये कला,साहित्य ,विज्ञान,सार्वजनिक सेवा आणि क्रीडा याचा समावेश आहे.या सन्मानाचा प्रारंभ २ जानेवारी १९५४ रोजी भारताचे तत्कालीन राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद यांच्या काळात केला गेला.हा सन्मान एका वर्षात जास्तीत जास्त तीन व्यक्तीना देण्यात येतो. डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांना १९५४ साली पहिला भारतरत्न सर्वोच्च नागरी सन्मान देवून गौरवण्यात आले.

प्रश्न–१) भारतातील सर्वोच्च नागरी पुरस्कार कोणता? (१गुण)
प्रश्न–२) भारतरत्न हा पुरस्कार कशासाठी दिला जातो? (१गुण)
प्रश्न–३) पहिला भारतरत्न पुरस्कार कोणाला मिळाला? (१गुण)
प्रश्न–४) भारतरत्न पुरस्कार एका वर्षात जास्तीत जास्त किती जणांना दिला जातो ? (१गुण)
प्रश्न–५) तुला माहित असलेल्या एका राष्ट्रापतीचे नाव सांग. (१गुण)

प्रश्न ८) भाषण,संभाषण व वाचन कौशल्य विकास
अ)तुला येत असलेली एक कविता तालासुरात म्हण. (३गुण)
ब) खालील परिच्छेद वाच. (२गुण)

कुंदापूरच्या उंबराच्या वाडीत शिवानी नावाची हुशार मुलगी राहत होती.ती मनमिळाऊ होती.तिचे आईवडील शेतात भाजी पिकवत आणि रविवारी कुंदापूरच्या बाजारात विकायला नेत असत.शिवानीसुद्‌धा त्यांच्या बरोबर जात असे.

शिवानी आईबाबांना हिशोबात मदत करायची.कधी कधी बाजारात फेरफटका मारायची.भजी व भेळ खाणे तिचा आवडता उद्योग.

✻ लेखी प्रश्नाबाबत शिक्षकांना सूचना✻

प्रश्न १) शब्द ऐकून लिही.(मुलांना खालील शब्द सांगावेत) (प्रत्येकी अर्धा गुण)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) फुलराणी | २) आश्चर्य | ३) मनुली | ४) ज्ञान | ५) किल्ला |
| ६) कौल | ७) पंखा | ८) कुंदापूर | ९) वर्ग | १०) कुत्रा |

activeguruji.com